**नि.क्र.२२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची साक्ष –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : गोपाळकृष्ण प्रभाकर देशपांडे
वय सुमारे : ६३ वर्षे, धंदा – व्यवसाय
राहणार : सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत –**

**०१.** मला सावंतवाडी पोलीसांनी दिनांक २७/११/२०२५ रोजी दुपारी ११.४५ वाजता फोन पोलीसांनी फोन केला व सावंतवाडी पोलीस ठाण्यात बोलावले. त्याप्रमाणे मी गेलो. मी सावंतवाडी पोलीस ठाण्यात गेलो असता त्यावेळी पोलीस अधिकारी अमोल चव्हाण व बाकी कर्मचारी होते. तसेच मठकर व रघुनाथ सावे हे देखील होते. मला रघुनाथ सावे यांनी सांगितले की दिनांक १८/११/२०२५ पासून २६/११/२०२५ या कालावधीमध्ये एक व्यक्ती क्राइमब्रँचचा पोलीस असल्याचे सांगून, त्यांचे केसमध्ये नाव आले असून त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांना मदत करेल व त्यांसाठी त्यांना पैसे दयावे लागतील असे सांगून त्यांची फसवणूक केली. त्यावेळी पोलीसांनी रघुनाथ सावे यांचेकडून त्यांचा गुगल कंपनी पीक्सेल ६अे मोबाईल तपासणी साठी घेतला, त्याचा आयइएमआयइ नंबर चेक केला व सीम चेक केला. त्यांनी १८/११/२०२५ दुपारी २.०० ते २६/११/२०२५ सध्यांकाळी ४.०३ मिनिट या कालावधीतील सर्व कॉल चेक केले. सावे यांचा मोबाई ल नं.९८५०१३७४६४ असा होता. मोबाइल क्र.७८३९९१८५८१ या नंबरवरुन सावे यांना कॉल आले. त्यानंतर रघुनाथ सावे यांच्या वर नमूद मोबाईलवरुन वॉटसअॅप चॅट हिस्ट्री चेक केली. त्यामध्ये ७८३९९१८५८१ या नंबरवरुन काही कागदपत्रे सावे यांच्या वॉटसअॅपवर पाठविले होते. या सगळयांची पोलीसांनी स्क्रीन शॉट काढला व त्यांची प्रिन्ट घेतली. एकूण १६ प्रिन्ट काढल्या, त्या आम्हाला दाखविल्या व त्यावर आमची सही घेतली.

(सदरच्या प्रिन्टऑऊट सोबत भारतीय साक्ष अधिनियम कलम ६३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र दाखल केले नसल्याने सदरचे प्रिन्टऑऊट पुराव्यात वाचता येत नाही.) सदर तपासणीबाबत व प्रिन्टऑऊट बाबत पोलसांनी पंचनामा केला. आता मला दिनांक २७/११/२०२५ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **नि.पी–१/पीडब्ल्यू १** देण्यात येते.

**सरकारी वकीलांनी भारतीय साक्ष अधिनियम कलम ६३ नुसार आवश्यक प्रमाणपत्राचे कामी पुढील कारवाई करणेकरीता मुदत मागितली. सबब साक्षीदाराचा सरतपास पुढील तारखेपर्यत तहकुब केला.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.03.10 16:13:12 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– ०९/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.